उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

# बिडे वार्तापत्र

बिडे (कोरकू) = उठा (मराठी)

**पत्र ८, महिना – सप्टेंबर २०१७**

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

===================================== = =====================================

## पालकसभा

गेल्या महिन्यात आम्ही आमच्या ‘शिकू आनंदे’ वर्गातील मुलांच्या पालकांची सभा घेतली. चीचपानी, चंदनपूर आणि चिपी या गावांमधील सभेला गावातील सर्व पालक हजर होते. चीचपानी येथे तर आई आणि वडील दोघांची उपस्थिती होती. त्यांच्यासोबत मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी चांगली चर्चा करता आली. वर्गाला नियमित येत असलेली मुलं आणि वर्गाला अनियमित असलेली मुलं यांच्यातील शैक्षणिक प्रगतीमध्ये तफावत कशी आली, याविषयी पालकांना माहिती दिली. पालकांना ते पटले. बैठकीत पालक एकमेकांशी एकमेकांच्या मुलांविषयी चर्चा करायला लागले, ते दृश्य फार छान होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून पालक मुलांना ‘शिकू आनंदे’ वर्गाला वेळेवर नियमित पाठवायला लागले. आमच्या कार्यकर्त्याला वर्गाच्या सुरुवातीला मुलांच्या घरी बोलवायला जावं लागत असे. पालकसभेनंतर मात्र ही मेहनत फार कमी झाली. **या पालकसभा यशस्वी होण्याचे कारण की पालकांच्या सोयीच्या वेळेत आम्ही सभा घेतल्या, म्हणजे सायंकाळी ६.३० ते ७.३०.**

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २४ (इ) म्हणते की, पालकांच्या नियमित सभा घेऊन, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयी, प्रगतीविषयी माहिती देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. परंतु, पालकसभा होताना कुठेही दिसत नाहीत. शिक्षक म्हणतात, पालक सभांना येत नाहीत, आणि पालक म्हणतात, आमच्या वेळेत सभा घेतली जात नाही.

मुलांचे शिक्षण चांगले होण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्वाची असतेच, पण पालकांचा सहभागही महत्वाचा असतो. मूल शाळेत नियमित येत असेल तर उपयोग होतो. नाहीतर अनियमित, शाळाबाह्य जर मूल असेल तर मुले शिकवलेले विसरतात आणि खूप मागे येतात. मुलांनी शाळेत नियमित यायचे असेल तर पालकांशी बोलणे गरजेचे आहे. आपल्या मुलांची प्रगती जाणून घेणे हा पालकांचा अधिकारही आहे. पालकांच्या सोयीच्या वेळेत सभा घेण्याचा आम्हाला तरी फार छान अनुभव आहे. पालकसभा नियमित व्हायला हव्यात हे शिक्षण हक्क कायद्याचे म्हणणे आम्हालाही मान्य आहे.




**चंदनपुर येथील पालकसभा**




**चीचपानी येथील पालकसभा**

## आम्ही केलेल्या सूचना किंवा सल्ला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ऐकला जातो

मूल कसं आणि काय शिकतं, त्याला काय अडचण येते, हे मी पालकसभेत सांगत होतो. शाळेत जाणे, शाळेतील पालकसभांना जाणे, काही सूचना, मदत शिक्षकांना करणे, हे करायला हवे व मुलांच्या शिक्षणात त्याचा सकारात्मक परिमाण दिसून येईल असे सांगत होतो. तेव्हा एक पालक म्हणाले, "*आम्ही गावातील जि. प. शाळेत जातो, पण शाळेत शिक्षक वेळेवर येत नाहीत. जेव्हा असतात, तेव्हा शाळेत गेलो की शिक्षकांना वाटते, की आम्ही त्यांना त्रास द्यायला आलोत. त्यांच्याशी काही बोलावे, तर ते कानाडोळा करतात, मग कसं करावं? पण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मात्र शाळेत गेलो, तर सर्व शिक्षक वेळेवर हजर असतात, मुलांच्या अभ्यासाविषयी काही सांगितले की ते ऐकून घेतात, आणि तसं काम सुद्धा करतात. त्यामुळे गावाची शाळा आणि इंग्रजी शाळा यांमधील फरक हा असा आहे, त्यामुळेसुद्धा पालक जि. प. शाळांमध्ये मुलं टाकत नाहीत.*"

पालकांबद्दल शिक्षकांचा नकारात्मक दृष्टीकोन आहे हेच जणू पालक सांगत आहेत..

## मुलांच शिकणं पाहतांना

'शिकू आनंदे' वर्गात पालक येऊन बसतात, कार्यकर्ता काय आणि कसं शिकवतो हे पाहतात. हे दृश्य फार कमी ठिकाणी पाहण्यास मिळतं, नाही का? हा अनुभव आमच्यासाठी फार महत्वाचा आहे. पालकसभेला त्याचा फायदा होतो, सभेत पालकच एकमेकांशी वर्गातील अनुभवांविषयी बोलतात, अनियमित मुले, येत असलेली मुले यांना कार्यकर्त्याला शिकवतांना येणाऱ्या अडचणी याविषयी बोलले जाते. मुलांनासुद्धा पालक येतात, सभांना जातात हे कळते. त्याने त्यांनासुद्धा चांगलं वाटतं.

## मुख्याध्यापकांना खूप कामं असतात..

मी एका शाळेवर कामानिमित्त गेलो होतो, शाळेत मुख्याध्यापक मुलांना बोलवायला गावात गेले होते. सकाळची शाळा होती, सहाय्यक शिक्षक त्यांच्या वर्गातील मुलांना शिकवत होते. मी कार्यालयात बसलो तसे मुख्याध्यापक आले, आणि मी येण्याचे कारण सांगितले. त्यावर ते म्हणाले, "आम्हांला शाळेची इतकी कामे असतात, की बस विचारू नका. शासनाने लेखी कामासाठी एका लिपिकाची व्यवस्था केली, तर खूप बरे होईल."

मी त्यांना विचारले, "शाळेचा पट किती?" ते म्हणाले, "२५ च्या आत. आणि शिक्षक दोन." मी विचारले, "तुम्ही लेखी काम कधी करता?" ते म्हणाले, "जसा वेळ मिळतो तस लेखीकाम करतो" "आणि शिकवता कधी?" तर म्हणाले, "जसा वेळ मिळतो, तसं शिकवतो. म्हणजे ना लेखी कामाची वेळ ना शिकवायची वेळ, कधी कधी तर न शिकवताच दिवस जातो." हे ऐकून मला राहवले नाही. मी त्यांना म्हटले, "सर मुलांचे शिक्षण होण्याला तुम्ही प्रथम प्राधान्य द्यायला हवे ना? कायदा आणि सर्व व्यवस्था हेच सांगते ना? तरी वरिष्ठांचा त्रास असेलच तर शाळा व्यवस्थापन समितीला त्याविषयी सांगून, वरिष्ठांना कळवावे की आम्ही शिकवण्याच्या वेळेत म्हणजे सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत इतर कुठलेही काम करणार नाही. मग आपण का लेखी कामाला जास्त महत्व देतो?" त्यावर ते म्हणाले की "वरिष्ठांकडून कधी कधी तत्काळ माहिती मागविली जाते, त्यावर ती देणे आम्हांला भाग असते." अशी माहिती किती वेळेस मागविली जाते? तरीही असे होत असेल, तर त्यासाठी वेगळा वेळ आहे. RtE नुसार दिवसातून किमान ४ तास तरी मुलांना शिकवण्यासाठी वापरले पाहिजेत. आणि शिक्षकाचे कामाचे तास आठवड्याचे ४५ असले पाहिजेत. मग तुम्ही सांगा, मुलांच्या शिकवण्याच्या वेळेत आपली लेखी कामे करतो, मग शिकवण्याचे झाले नाही तरी चालते, कारण **आपण वरिष्ठांना जबाबदार असतो, पालकांना किंवा मुलांना नाही, असेच ना?** मुलांना काही येवो किंवा न येवो त्याने काही फरक पडत नाही. वरिष्ठ मात्र रागवायला नकोत."

(शब्दांकन - शरद सूर्यवंशी)

उन्नती संस्था, द्वारा, श्री. अरुण सोनोने, पूर्वा नगर, MSEB कार्यालयासमोर बसथांब्याजवळ आडगाव बु. ता. तेल्हारा, जि. अकोला ४४४ १२६ (unnati.akot@gmail.com) फोन ९५५२७८१०८२